जा.क्र.कृआ/फलो-२/क रो उपलब्धता /20999/२०२१
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-५
दिनांक - ०२/०७/२०२१

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक, (सर्व)
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (सर्व).

**विषय :- शासकीय,परवानाधारक खाजगी व कृषि विद्यापीठाच्या/कृषि विज्ञान केंद्राच्या रोपवाटिकांवरील लागवडीयोग्य कलमे/रोपे उपलब्धतेची माहिती करीता संपर्काबाबत.....**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने राज्यातील शासकीय,परवानाधारक खाजगी व कृषि विद्यापीठाच्या रोपवाटिकांवरील विविध फळपिकांच्या कलमे/रोपे उपलब्धतेच्या आकडेवारीची माहिती राज्यातील शेतकऱ्यांना लागवडीकरिता उपलब्ध करून देणेसाठी सदर आकडेवारीप्राप्त करून **krishi.maharashtra.gov.in** या कृषि विभागाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी या कार्यालयाकडून **google spread sheet** तयार करण्यात आलेली आहे. तरी या **google spread sheet** चा वापर करून विभाग/जिल्हा/उपविभागातील फळपिकनिहाय कलमा/रोपांची आकडेवारी रोपवाटिकानिहाय प्रत्येक आठवड्याच्या अखेरीस (प्रत्येक शुक्रवार पर्यंत) प्राप्त करून घेवून संकेतस्थळावर प्रदर्शित करावयाची आहे. सद्या लागवडीचा हंगाम सुरु झालेला असून राज्यातील शेतकऱ्यांना अद्यावत माहिती करिता या कार्यालयाकडे वारंवार पाठपुरावा केला जात असतो.त्यानुषंगाने कलमे/रोपे उपलब्धतेची माहिती संकेतस्थळावरील कलमे/रोप उपलब्धता या आयकॉन मध्ये प्रदर्शित केली जाणार आहे .तरी प्रत्येक आठवड्याच्या शुक्रवार पर्यंत माहिती अद्यावत करणेबाबत आवश्यक ती खबरदारी घेण्यात यावी. तसेच लागवडीसाठी उपलब्ध असलेली कलमे/रोपे बाबतची माहिती जास्तीत जास्त अचूकपणे भरली जाईल याची काळजी घेण्यात यावी. अन्यथा यापूर्वी भरलेली कलमा/रोपांची उपलब्धता अंतिम करण्यात येईल. व त्याप्रमाणे माहिती अंतिम धरून कृषि विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल याची सर्वस्वी जाबाबदारी पर्यवेक्षकीय अधिकारी म्हणून विभागीय कृषि सहसंचालक/ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील तंत्र अधिकारी यांची राहील याची नोंद घ्यावी.

**शेतकऱ्यांना संकेतस्थळावर फळरोपवाटिकांवरील लागवडी योग्य कलमे/रोपे उपलब्धतेनुसार संपर्क करणेसाठी सर्व विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील तंत्र अधिकारी यांचे नावे,दूरध्वनी क्रमांक खालील प्रमाणे,**

| अ क्र. | विभाग | तंत्र अधिकारी यांचे नाव | दूरध्वनी क्रमांक | कार्यालयाचा संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | श्री.रावसाहेब जाधव | ९४०३७७८१५२ | २२-२५८२३४७९/ २५८२०४०७ |
| २ | नाशिक | श्री. अभय फाळके | ९४२३५७५३२५ | २५३ -२४६८३६१/२४६८३६२ |
| ३ | पुणे | श्री. संजय हाके | ९८२२११९३०९ | २०- २५५३७६९६ |
| ४ | कोल्हापूर | श्रीमती जयश्री हावळे | ९४२१३९८९२७ | २३१- २६००२५८/२६००७१५ |
| ५ | लातूर | श्री.कुलकर्णी | ९४२११९४७६५ | २३८२- २४२४३८ |
| ६ | औरंगाबाद | श्री.विवेक गायकवाड | ७५८८५५१३४८ | २४०- २३३१०९४ |
| ७ | अमरावती | श्रीमती वैशाली आठरे | ७६६६४२०९२० | ७२१- २५५२४२२/२१९०३०० |
| ८ | नागपूर | श्रीमती नैरुत्या भसारकर | ९०९६७५१७२७ | ७१२- २५५५९४६ |

(कैलास मोते )
संचालक फलोत्पादन
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य
पुणे - ४११००५.